42

भारतीय संविधानानुसार व मंडल आयोगाने
केलेल्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना
अकृषि विद्यापीठे व संलग्नित शासकीय/अशासकीय
कला/वाणिज्य/विज्ञान/शिक्षणशास्त्र या शैक्षणिक
संस्थांमधील प्रवेशासाठी आरक्षण

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : युएसजी–१४९३/(२४२८)/विशि–४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२,
दिनांक : २३ जून, १९९४.

वाचा : १. शासन निर्णय, शिक्षण विभाग क्र. एमआयएस–१०७४/१३०२–एम, दिनांक २७ जून, १९७४.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९३/२१६७/सीआर–१४१/९३/१६–ब, दिनांक २३ मार्च, १९९४.

३. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३ (२४२८)/विशि–४, दि. १० मे, १९९४.

४. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. युएसजी–१४९३/(२४२८)/विशि–४, दि. १३ मे, १९९४.

**शासन निर्णय** : शासन निर्णय, शिक्षण विभाग क्र. एमआयएस–१०७४/१३०३–एम, दिनांक २७ जून, १९७४ अन्वये, शासकीय/अशासकीय शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेशासाठी खालीलप्रमाणे आरक्षण विहित करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| १. अनुसूचित जाती आणि नवबौद्ध | १३% |
| २. अनुसूचित जमाती (विनिर्दिष्ट भागाव्यतिरिक्त इतर भागातील धरून) | ७% |
| ३. विमुक्त आणि भटक्या जमाती | ४% |
| ४. इतर मागासवर्गीय | १०% |
| एकूण | ३४% |

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी–१०९३/२१६७/सीआर–१४१/९३/१६–ब, दिनांक २३–३–९४ अन्वये मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागासवर्गीयांना तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातींकरिता खालीलप्रमाणे सुधारित आरक्षण विहित करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| (अ) विमुक्त जाती (१४ व तत्सम जाती) | ३% |
| (ब) भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| (क) भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | ३.५% |
| (ड) भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | २% |
| (इ) इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) | १९% |
| एकूण | ३०% |

३. शैक्षणिकसंस्थांमध्ये प्रवेश देण्यासाठी अपंग, संरक्षण सेवा, अनिवासी भारतीय, भारत सरकारचे नामनिर्देशित उमेदवार वगैरे विविध गटांकरितासुद्धा आरक्षण असते. तेव्हा या सर्व बाबींचा विचार करून मागासवर्गीयांच्या घटनेत मान्य गटांकरिता १९९४–९५ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय/अशासकीय, अनुदानित व विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र इत्यादि संस्थांमध्ये खालीलप्रमाणे राखीव जागांचे प्रमाण विहित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

| | |
|---|---|
| १. अनुसूचित जाती व अनुसूचित जातीमधील बौद्धधर्म स्वीकारलेल्या व्यक्ती | १३% |
| २. अनुसूचित जमाती | ७% |
| ३. विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) | ३% |
| ४. भटक्या जमाती (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | २.५% |
| ५. भटक्या जमाती (धनगर व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | ३.५% |
| ६. भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती, यादी जोडल्याप्रमाणे) | २% |
| ७. इतर मागासवर्गीयांकरिता (ओ.बी.सी.) | १९% |
| एकूण | ५०% |

४. सदर आरक्षण प्रत्येक संस्थेमध्ये अभ्यासक्रमनिहाय असेल आणि ते मुक्त आणि गुणवत्ताधारित जागांकरिता त्यांच्या त्यांच्या प्रमाणात असेल.

५. आरक्षित जागा या प्रथमतः भरण्यात याव्यात. मात्र आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला तरी गुणवत्तेनुसार त्या उमेदवाराच्या अभ्यासक्रम किंवा संस्था याबाबतच्या काही किंवा सर्व फक्त वरच्या पसंतीकरिता अराखीव जागांमधून प्रवेश देण्यासाठी त्यांच्या विनंतीनुसार पुनर्विचार करण्यात यावा.

६. शैक्षणिकसंस्थांमध्ये प्रवेश देताना एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास ते आरक्षण अनुशेष म्हणून पुढे ओढण्यात येत नसल्यामुळे व ते त्याच वर्षी भरावयाचे असल्यामुळे मागासवर्गाच्या इतर गटातील उमेदवारांना प्रवेश देऊन आरक्षण पूर्ण करण्यात यावे. यासाठी दिनांक २७ जून, १९७४ च्या परिच्छेद २ मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कार्यवाही करण्यात यावी. मात्र अदलाबदलीने इतर प्रवर्गातून भरण्याची तरतूद करताना अशाप्रकारे उपलब्ध मागासवर्गीयांची संख्या मूळ आरक्षण अधिक अदलाबदलीने झालेले विद्यार्थी यांची संख्या धरून ५०% पेक्षा अधिक असणार नाही.

७. मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार "क्रीमीलेयर" चे तत्त्व केंद्र शासनाने मान्य केले आहे. यासंदर्भात सविस्तर आदेश, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाकडून निर्गमित करण्यात आलेले आहेत. समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाच्या आदेशाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मा. ना. कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

भटक्या जमाती "क"

धनगर व त्यांच्या तत्सम जातींची यादी

धनगर :—(१) अहिर, (२) डांगे, (३) गडारी, (४) हंडे, (५) तेलवर, (६) हटकर (७) हाटकर, (८) डेंगर, (९) खुटेकर, (१०) तेलंगी, (११) तेल्लारी, (१२) कोकणी-धनगर, (१३) सागडे, (१४) बऱ्हाडे-धनगर, (१५) झाडे, (१६) झेंडे, (१७) कुरमार, (१८) महुरे, (१९) लाडसे, (२०) सनगर, (२१) धनगर.

(सीबीसी–१०८९/(२०३)/मावक–५, दि. २५ मे, १९९० अन्वये)

भटक्या जमाती "ड"

वंजारी व तत्सम जातींची यादी

वंजार, वंजारा, वंजारी.

2.2 Number of seats earmarked for reserved category as per GOI/ State Govt rule year wise during last five years Upload supporting document**

| 2012-2013 | 2013-2014 | 2014-2015 | 2015-2016 | 2016-2107 |
|---|---|---|---|---|
| 467 | 485 | 618 | 592 | 528 |

B. D. KALE MAHAVIDYALAYA Ghodegaon Code No. 196

*Signature of the Principal*